● शुक्रवार, दि. १३ डिसेंबर २०२४ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १३५ वा ● किंमत २ रुपये ● पाने ४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘एक देश, एक निवडणुक’

## केंद्रीय मंत्रिमंडळाची विधेयकाला मंजुरी; पुढील आठवड्यात विधेयक संसदेत!

**नवी दिल्ली -** देशात ‘एक देश, एक निवडणूक’ हे धोरण राबविण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली होती. या समितीचा अहवाल केंद्रीय मंत्रिमंडळाने सप्टेंबर महिन्यात स्वीकारला होता. त्यानंतर गुरुवार (दि. १२ डिसेंबर) रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाने या विधेयकाला मंजुरी दिली आहे. पुढील आठवड्यात हे विधेयक संसदेत सादर होण्याची शक्यता आहे.

एक देश, एक निवडणूक पद्धत २०२८ ला अस्तित्वात आणण्यासाठी मोदी सरकारच्या वतीने प्रयत्न केले जाणार आहेत. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद समितीने १८ हजार पृष्ठांचा अहवाल तयार केलेला आहे. ज्यावर २१ हजार दुरुस्त्या येऊन त्यापैकी ८० टक्के दुरुस्त्या या पद्धतीच्या बाजूने आहेत अशी समिती म्हणते. या समितीचा ३७६ पृष्ठांचा संक्षिप्त अहवाल वेबसाईटवर उपलब्ध आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिल्यानंतर हे विधेयक संसदेत मंजूर झाल्यास ‘एक देश, एक निवडणूक’ धोरण पुढील लोकसभा निवडणुकीवेळी, म्हणजे २०२९ मध्ये राबविले जाण्याची शक्यता आहे. त्यासाठी संसदेत घटनादुरुस्तीद्वारे ही प्रक्रिया राबवावी लागेल. तसेच




देशभरात व्यापक चर्चा करून सहमती निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकारकडून केला जात आहे. भाजपच्या लोकसभा निवडणुकीच्या जाहीरनाम्यामध्ये ‘एक देश, एक निवडणुकी’च्या आश्वासनाचा समावेश होता. शिवाय, ‘रालोआ ३.०’ सरकारच्या पहिल्या १०० दिवसांच्या लक्ष्यपूर्तीमध्येही हे धोरण सामील करण्यात आले होते. सरकारने मंगळवारी (१७ सप्टेंबर) १०० दिवस पूर्ण केले असून त्याच्या दुसऱ्याच दिवशी केंद्रीय मंत्रिमंडळाने कोविंद अहवालाला मंजुरी दिली होती.

‘रालोआ’ सरकारमधील प्रमुख दोन घटक पक्ष जनता दल संयुक्त आणि तेलुगु देसम पार्टी यांनी एक देश, एक निवडणूक धोरणाला आधीच पाठिंबा दिला आहे. देशात विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या वेळी विधानसभेची निवडणूक होत असल्यामुळे दरवर्षी कुठल्या ना कुठल्या राज्यामध्ये निवडणुका होतात, त्यासाठी आचारसंहिता लागू करावी लागते, त्यामुळे विकासाची गती मंदावते, असा युक्तिवाद भाजपने केला आहे. ‘एकाच वेळी निवडणुका होत असल्याने पैशांचा अपव्यय कमी होतो, काळ्या पैशांवर नियंत्रण येते, विकासाची गती कायम राहते. त्यामुळे हे धोरण राबवणे काळाची गरज असून २०४७ मध्ये देशाला विकसित करण्याच्या धोरणाचाच हा भाग आहे’, असे मत केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी संप्टेबर महिन्यात घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये मांडले.

### एमआयडीसीतील १४ मालमत्ताधारकांना जप्तीच्या नोटीसा

**जालना । प्रतिनिधी-** एमआयडीसीतील १४ मालमत्ताधारकांना जप्तीच्या नोटीसा देण्यात आल्या असून खुद्द अतिरिक्त आयुक्त यांनी स्वतः फिल्डवर जाऊन या नोटीसा दिल्या आहेत. येत्या ३१ डिसेंबर पुर्वी कराचा भरणा न केल्यास त्या पुढील आठवड्यात मालमत्ता सील करणार असल्याचे मनपा प्रशासनाने सांगितले आहे. तसेच मालमत्ता धारकाच्या रकमेवर दोन टक्के प्रति महिना व्याज आकारण्यात येणार आहे.

# जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टीने बाधित खरीप पिकांच्या नुकसान भरपाईपोटी ४१२ कोटी रुपये अनुदान

## आमदार बबनराव लोणीकर यांची विशेष आग्रही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली मंजूर

**जालना । प्रतिनिधी -** वंचित, पीडित, विस्थापित, कष्टकरी, शेतमजूर, शेतकरी वर्गाला त्यांचे न्याय व हक्क मिळवून देण्याकरिता गेल्या ४० वर्षापासून अविरत संघर्ष करणारे लोकप्रिय लोकप्रतिनिधी म्हणून राज्यभरात ओळख असलेले महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री, परतूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नाला यश आले आहे. जालना जिल्ह्यातील २ लाख ८२ हजार ५३८ शेतकऱ्यांचे खरीप हंगाम २०२४ मध्ये अतिवृष्टी, गारपीट वादळ वारा आणि पुरामुळे २ लाख ५५ हजार ५१९ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते.

खरीप पिका सह फळबागांच्या नुकसानी पोटी जालना जिल्ह्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार लोणीकर यांच्या आग्रही मागणी नुसार जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांसाठी सुमारे ४१२ कोटी रुपये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मंजूर केले आहे. या मूळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना दिलासा मिळाला आहे. ०१ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अतिवृष्टीने आलेल्या पुरामुळे, सततधार झालेल्या पावसासह वादळ वारा आणी गारपीटीने मंठा व परतूर तालुक्यातील झालेल्या नुकसानीची पाहणी भरपावसात माजी मंत्री तत्कालीन आमदार बबनराव लोणीकर यांनी पोळा सणाच्या दिवसी गावा गावात जाऊन केली होती. यावेळी अतिवृष्टीने बाधित नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिले होते. याबाबतीत माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी तहसील कार्यालय मंठा व तहसील कार्यालय परतूर येथे आढावा बैठक घेऊन मंठा परतूर व जालना तालुक्यातील गावा गावातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची व पडझड झालेल्या नुकसानग्रस्त घरांची तातडीने पंचनामा करून जिल्हाधिकारी कार्यालयास अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. यानंतर तातडीने लगेचच आमदार लोणीकर यांनी जिल्हाधिकारी जालना यांच्या दालनात आढावा बैठक घेऊन जालना जिल्ह्यातील अतिवृष्टीने बाधित खरीप हंगामातील पिका सह फळबागाच्या नुकसानीची पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना अर्थसाह्य उपलब्ध करून देण्यात करिता तातडीने विभागीय आयुक्त यांच्याकडे अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या होत्या. माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे जून ते ऑक्टोबर, २०२४ या महिन्यात अतिवृष्टी/पूर यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी विभागीय आयुक्त यांचेकडून निधी मागणीचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले होते. या अनुषंगाने तातडीने



उब्ढ पोर्टलव्दारे शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सदरील अनुदान निधीतून कुठल्याही प्रकारच्या कर्जाची वसुली करण्यात येऊ नये असे आदेश शासन निर्णयान्वये पारित झाले आहे. सदरील अनुदान प्रति शेतकरी तीन हेक्टर पर्यंत मर्यादित असल्याची देखील शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले असल्यामुळे जालना जिल्ह्यातील शेतकरी बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले असून गावागावातील शेतकरी बांधव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणी आमदार बबनराव लोणीकर यांच्यासह महायुती सरकारचे आभार मानत आहेत.

युवा आदर्श

शतक शुभेच्छा...

पावसात भिजताना
लाजले आपणा वय
जनसेवा तीव्र इच्छा
कधी न शिवले भय
मदत करताना कर्ण
ये बळीराजाची सय
काळही देईल साक्ष
अचूक आपले निर्णय
जनसेवा प्रश्न उठता
कधी न कुणाची गय
दीनदलित हीत जपे
मुळी न कधी हयगय
साहित्य संमेलन येता
लागली आगळी लय
संकट काळचे दार तू
दिले कित्येकां अभय
मदतीला धावून जावे
अंगभूत जुनी सवय
नैपुण्य प्रत्येक क्षेत्री
रे बालपणीची सवय
भरभरून घेऊन जा
असेचं मनाचे आलयं
फिरत राहते स्वताचं
भोवती कर्तृत्व वलय
जीवेत् शरद : शतम्
बोलते प्रत्येक हृदय
मिळो मान भारतरत्न
आता एवढेचं हवयं

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

### मंदिरांची संपत्ती हस्तगत करून गोरगरिब मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावी -डॉ. मिरगे



**जालना । प्रतिनिधी -** देशातील मंदिर संस्थानांची संपत्ती सरकारने हस्तगत करून गोरगरिबांच्या मुलांच्या शिक्षणासाठी खर्च करावी,मानवी जीवनामध्ये शिक्षणाचे महत्व खूप मोठे आहे असे स्व.डॉ. पंजाबराव देशमुख सांगितले असल्याचे प्राचार्य डॉ. राजेश मिरगे यांनी जेईएस महाविद्यालय जालना येथे आयोजित डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीच्या रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त विशेष व्याख्यानात प्रतिपादन केले. महाराष्ट्रभर डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंती रोप्य महोत्सवी वर्षानिमित्त शिवाजी शिक्षण संस्था अमरावती तर्फे विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते जे ई एस महाविद्यालय जालना येथे शिवाजी महाविद्यालय अमरावती येथील पान २ वर

### गीता ही वैश्विक विचाराने भारावली आहे - प्रा. आहेर



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** नवभारत कनिष्ठ महाविद्यालय येथे गीता जयंती निमित्त प्राध्यापक अरुण आहेर यांचे व्याख्यान संपन्न झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष त्यांनी भिलावेकर ह्या होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख, प्राध्यापक सुनील बनसोडे, प्राध्यापक कैलास जाधव, प्राध्यापक गजानन धोटे, वासुदेव क्षीरसागर, कैलास भुतेकर, गणित शिक्षिका शेख मॅडम, पाटील मॅडम, कळंबे मॅडम पान २ वर

# गृहमंत्री, अर्थमंत्री भाजपाकडेच!

## दोन दिवसांत मंत्रिमंडळ विस्तार; लोणीकर व खोतकर यांचा मंत्रिमंडळात समावेश!

**नवी दिल्ली -** महाराष्ट्रात सध्या मंत्रीमंडळ विस्ताराची चर्चा आहे. दिल्लीत देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार एकाच वेळी उपस्थित असताना एकनाथ शिंदे महाराष्ट्रातच आहेत. शपथविधीच्या वेळी ही एकनाथ शिंदे हे नाराज असल्याचे दिसून आले. अवघे दोन तास पुर्वी त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार असल्याचे कळविले होते. आता दिल्लीत अजित पवारांनी शरद पवारांची तर देवेंद्र फडणवीसांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह पक्षाच्या प्रमुख नेत्यांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात तर्क-वितर्कांना उधाण येऊ लागले आहे. गृहमंत्री आणि अर्थमंत्री ही दोन्ही पदे भाजपाकडेच राहणार असून १४ तारखेला मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची शक्यता असल्याची माहिती खात्रीलायक सुत्रांकडून मिळत आहे. जालना विधानसभा मतदार संघाचे आमदार अर्जुनराव खोतकर व परतूर मतदार संघाचे आमदार माजी मंत्री बबनराव लोणीकर यांचा मंत्रिमंडळात समावेशाची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

भाजप २१, शिवसेना १३, आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे ९ मंत्री अशा एकूण ४३ मंत्र्यांचा फॉर्म्युला जवळपास निश्चित झाला आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. विशेष म्हणजे मंत्रिमंडळ विस्ताराच्या पहिल्या टप्प्यात भाजपचे १७, शिवसेनेचे १० आणि राष्ट्रवादी काँग्रेस ७ मंत्री शपथ घेतील, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. यामधील आणखी एक मोठी बातमी म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दोन मोठी खाती असणार आहेत. यामध्ये नगरविकास विभाग



आणि महसूल विभाग यांचा समावेश आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे गृहनिर्माण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचं खातं असणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा याबाबत त्यापेक्षा वरचष्मा असणार आहे. कारण त्यांच्याकडे गृह आणि अर्थ ही दोन्ही महत्त्वाची आणि ताकदवान खाती असण्याची शक्यता आहे.

**भाजपचे संभाव्य मंत्री -** चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांत पाटील, सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, प्रवीण दरेकर, मंगलप्रभात लोढा, बबनराव लोणीकर, पंकजा मुंडे, आशिष शेलार, संभाजी निलंगेकर, जयकुमार रावल, शिवेंद्रराजे भोसले, नितेश राणे, विजयकुमार गावित, देवयानी फरांदे, राहुल कुल, माधुरी मिसाळ, संजय कुटे, गोपीचंद पडळकर

**शिवसेनेचे संभाव्य मंत्री -** दादा भुसे, उदय सामंत, शंभूराज देसाई, गुलाबराव पाटील, मंगेश कुडाळकर, अर्जुन खोतकर, पान २ वर

## संपादकीय पान

# संविधानाचा समावेश अभ्यासक्रमात हवा

नुकताच २६ नोव्हेंबरला संपूर्ण देशात संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. अमृत महोत्सवी संविधान दिना निमित्त संपूर्ण देशात संविधानाचा जागर करण्यात आला. ठिकठिकाणी विविध उपक्रमांद्वारे संविधानाचे महत्व अधोरेखित करणारे कार्यक्रम, उपक्रम राबवण्यात आले मात्र संविधान दिन हा फक्त एक दिवसाचा सोहळा ठरता कामा नये वास्तविक संपूर्ण वर्षभर संविधानाचा जागर व्हायला हवा. दौंड मधील 'आम्ही भारताचे लोक' ही सामाजिक संघटना वर्षभर म्हणजे वर्षातील ३६५ दिवस संविधानाचा जागर करते. संविधानाच्या एका कलमा वर दररोज विस्तृत चर्चा केली जाते. संविधानाने दिलेले हक्क आणि अधिकार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचवण्याचे काम ही संघटना करते. या संघटनेच्या या कार्याचे खरोखरच कौतुक व्हायला हवे. आम्ही भारताचे लोक संघटनांसारख्या वर्षभर संविधानाचा जागर करणाऱ्या संघटना अतिशय कमी आहेत म्हणूनच नागरिकांमध्ये संविधानाबाबत अद्यापही म्हणावी तशी जागृती होऊ शकली नाही. संविधान लागू होऊन आज ७५ वर्ष उलटली तरी नागरिकांना आपले हक्क आणि अधिकार माहीत नाहीत म्हणूनच संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करण्याची वेळ आली आहे. संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश करावा ही खूप जुनी मागणी आहे मात्र त्याला अद्यापही म्हणावा तसा प्रतिसाद मिळत नाही. नाही म्हणायला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या पदवीचे शिक्षण घेणाऱ्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना दोन श्रेयांकाचा,( क्रेडिट कोर्स) शिकवला जात आहे मात्र हा कोर्स घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या त्यामानाने खूप कमी आहे म्हणूनच संविधान हा विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करावा. आज आपल्या देशात लाखो विद्यार्थी पदवीधर होतात पण आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी विद्यार्थ्यांना असतो. उच्च शिक्षित असूनही संविधानाची जुजबी माहितीही विद्यार्थ्यांना नसते. शालेय अभ्यासक्रमात नागरिकशास्त्र हा विषय शिकवला जातो तो पण त्रोटक स्वरूपात शिकवला जातो त्यात संविधानाची माहिती नसते. स्थानिक स्वराज्य संस्था, त्यांचे कार्य - अधिकार, निवडणूक, लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, लोक्रतिनिधींनिंची जबाबदारी, अधिकार अशा स्वरूपाचीच माहिती नागरिक शास्त्रात पाहायला मिळते त्यामुळे संविधानाबाबत उच्च शिक्षित विद्यार्थी अज्ञानीच असतात. त्यांचे हे अज्ञान दूर होण्यासाठी संविधानाचा अभ्यासक्रमात समावेश होणे गरजेचे आहे. भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, कर्तव्य, अधिकार यांचा समावेश आहेच पण देशाचा आदर्श कारभार कसा करावा याचेही नियम आहेत. समता, बंधुता यांचीही शिकवण संविधानात आहे. संविधानामुळेच देश अखंड आहे. संविधान हा लोकशाहीचा पाया आहे. संविधान हा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक आहे. संविधान आपला राष्ट्रीय ग्रंथ आहे. भारताचे संविधान शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवले तर राज्याच्या आणि राष्ट्राच्या उभारणीत ते योग्य दिशेने आपापल्या क्षेत्रात कार्य करू शकतील म्हणूनच हा विषय अभ्यासक्रमात समाविष्ट होणे ही काळाची गरज आहे.



**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

### रुग्ण सेवेचा वटवृक्ष; आरोग्यदूत मंगेश चिवटे

# समाजसेवेसाठी झपाटलेली माणसे पदमुक्त होतात... कार्यमुक्त नाही...

महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन संवेदशील मुख्यमंत्री आणि सद्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तेव्हा मुख्यमंत्री पदावर विराजमान होताच महाविकास आघाडीच्या काळात बंद करण्यात आलेली मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाची पुन्हा निर्मिती करून नव्याने सुरुवात केली.कोरोनाच्या काळात मंगेश चिवटे यांनी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडली होती. त्यावेळी त्यांनी असंख्य गरजूंना मदत केली होती.कोरोनातील कामगिरीमुळे त्यांना आरोग्यदूत म्हणत होते.त्यांची ही धडपड,तळमळ,प्रामाणिकपणा आणि संवादाची शैली पाहूनच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्यावर विश्वास टाकला.या वैद्यकीय मदत कक्षाची धुरा आरोग्यदूत रुग्णसेवक मंगेश चिवटे यांच्यावर सोपविली.तेव्हा मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे कक्षधिकरी मंगेश चिवटे व त्यांच्या सहकाऱ्यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दाखविलेल्या विश्वासाला पात्र ठरत दोन वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे काम दोन वर्षाच्या कार्यकाळात राज्यभरात सर्वदूर पोहचविले.जात धर्म,पंथ न बघता रुग्णांना अडचणीच्या काळात काळ वेळ न बघता वेळेत वैद्यकीय उपचारासाठी मदत दिली.राज्यातील सर्व गोरगरीब तथा आर्थिक दुर्बल घटकातील रुग्णांना दुर्धर आजारांसाठी (कर्करोग,मेंदुरोग,हृदयविकार, किडणी / यकृत प्रत्यारोपण) तात्काळ आर्थिक मदत मिळावी,यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात स्वतंत्र असा मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष असावा,अशी संकल्पना आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी २०१४ मध्ये जेव्हा शिवसेना-भाजपा महायुतीचे सरकार स्थापन झाले तेव्हा मांडली होती;त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस असताना त्यांनी ११ मार्च २०१५ मध्ये या संकल्पनेस मान्यता दिली आणि मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष अस्तित्वात आला.जून २०२२ मध्ये शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली उठाव झाल्यानंतर शिवसेना- भाजपा महायुतीचे सरकार स्थापन झाले.या महायुती सरकारच्या काळात राज्याचे तत्कालीन संवेदनशील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मागील अडीच वर्षामध्ये,मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षा अंतर्गत,कक्ष प्रमुख मंगेश चिवटे कार्यरत असताना त्यांच्या निस्वार्थी टीमच्या साथीने एकूण ४१९ कोटी पेक्षा अधिक अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले.यामुळे ५१ हजार पेक्षा अधिक रुग्णांचे प्राण वाचले(रुग्णांच्या मदतीसाठी एकुण ३८१ कोटी २० लक्ष रुपये,तर नैसर्गिक आपत्ती घटनांमध्ये नुकसान भरपाई मदत म्हणुन ३८ कोटी ६६ लक्ष रुपये वितरीत करण्यात आले).गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीचे कामकाज रोज सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत दररोज सुमारे १२ तास सुरु असे.सर्वात महत्वाचे म्हणजे गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या सहकाऱ्यांनी एकही दिवस सुट्टी घेतली नाही.सुट्टीच्या दिवशी शनिवारी रविवारी देखील कामकाज सुरू असे.अगदी सण-उत्सवाच्या काळात देखील मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या सहकाऱ्यांनी काम केले.मंत्रालयाची वेळ बंद झाल्यावर देखील एकमेव मंत्रालयातील सातव्या मजल्यावर असलेले वैद्यकीय मदत कक्षाचे कार्यालय रुग्णसेवेसाठी सुरू असल्याचे अनेकांनी बघितले असून अनेकदा अनेक वृत्तपत्र व प्रसारमाध्यमांनी त्यांच्या कार्याची दखल ही घेतली आहे.त्यामुळे आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या कार्यकाळात मंत्रालयात सुरू असलेले हे जरी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष असले तरीही आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी त्याला राज्यातील गोरगरीब रूग्णांचे आरोग्य मंदिरच बनवले होते.राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या माध्यमातून गेल्या अडीच वर्षात मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत सर्वसामान्य रुग्ण डोळ्यासमोर ठेवून अनेक विविध बदल करत १०० टक्के पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केला.यामध्ये टोल फ्री क्रमांक ८६५०५६७५६७ सुरु केला.सोबतच रुग्णांना मंत्रालयात हेलपाटे घालावे लागु नये यासाठी जपश्रळपश ग्र्रिळलरींलेप प्रणाली सुरु केली गेली.(आता ए-चरळश्र व्दारे अर्ज स्विकारले जातात).मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये रुग्णालय अंगीकृत (कैर्व्लिरिश्र एारिपिशश्राशपीं) प्रक्रिया तसेच या योजनेअंतर्गत रुग्णांना अर्थसहाय्य मिळवण्याची प्रक्रिया संपुर्णतः निःशुल्क/मोफत असल्याची जनजागृती केली गेली. ना वशिला,ना ओळख,थेट मिळते



मदत हे ब्रिद वाक्य करुन हा कक्ष लोकाभिमुख बनवला.या योजनेच्या नावाखाली गरजू रुग्णांची आर्थिक पिळवणूक करणाऱ्या दलालांची साखळी तोडण्यास आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या टीमला यश मिळाले. गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी ऑनलाईन,पूर्णतः निःशुल्क आणि पारदर्शक केल्याने आता ही केवळ एक योजना राहिली नसून,ती लोकचळवळ करण्यात आरोग्यदूत मंगेश चिवटे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांना यश आले हे वास्तव आहे.योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्याला मंत्रालयात नव्हे तर गावपातळीवरील रुग्णसेवकाशी केवळ संपर्क करावा लागत होता,ही सर्वात मोठी उपलब्धी आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या कार्यकाळात करण्यात आली.आरोग्यदूत मंगेश चिवटे यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या निकषातील आजारांची संख्या वाढवणे,निधीची/मदतीची मर्यादा वाढवणे, उत्पन्नमर्यादेची अट शिथील करणे,योजनेच्या लाभासाठी सुलभता आणण्यासाठी प्रक्रिया ऑनलाईन करणे,यांसारखे बदल करण्यात त्यांना यश आले.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून अडीच वर्षात तब्बल ५१ हजार पेक्षा अधिक रुग्णांना ४१९ कोटी रुपयांची मदत वितरीत करता येणे,हे केवळ आणि केवळ महाराष्ट्रातील हजारो निःस्वार्थ रुग्णसेवकांचे यश आहे असे आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कक्षप्रमुख पदावरून मुक्त होताना प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रात सांगितले. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना जनसामान्यांचा नेता म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण होण्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधी विभागाचा मोठा वाटा होता.मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून एकनाथ शिंदे यांनी अनेक गरजू रुग्णांवर मोफत उपचाराची मदत केली आहे.यामध्ये आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती.तसेच तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे जरी राज्याच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात दौऱ्यावर असले किंवा कामात असले तरीही त्यांच्याकडे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीसाठी कोणत्याही रुग्णाचा अर्ज गेला की ते लगेच सर्व काम बाजूला ठेऊन सर्वात प्रथम प्राधान्य ते रुग्णसेवेला देत असत,हे त्यांच्या कृतीमधून खूपवेळा दिसून आले आहे.तसेच अगदी सोमवारी रात्री झालेल्या कुर्ला बस अपघातानंतरही मंगेश चिवटे तातडीने कामाला लागल्याचे दिसून आले होते.त्यावेळी आरोग्यदूत मंगेश चिवटे यांनी रुग्णालयात जाऊन कुर्ला अपघात प्रकरणातील जखमींची विचारपूस केली होती.या सगळ्यामुळे मंगेश चिवटे यांनी स्वतःचेही एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. कालही अगदी आरोग्यदूत मंगेश चिवटे सर पदमुक्त होत असताना आपल्याकडील पदभार रामेश्वर नाईक यांना देत असताना चिवटे सरांमधील दिलदार मंगेश यावेळी दिसून आला.मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे आरोग्यदूत मंगेश चिवटे सर हे जरी त्या पदावरून पदमुक्त झाले असले तरीही त्यांच्यामधील रुग्णसेवक कालही जिवंत होता,आणि आजही आहे आणि शेवटच्या श्वासापर्यंत जिवंत असेल यात काही शंका नाही. आज जरी आदरणीय आरोग्यदूत मंगेश चिवटे सर पदमुक्त झाले असले तरी समाजसेवेसाठी झपाटलेली माणसे पदमुक्त होतात..कार्यमुक्त नाही.हेच त्यांच्या रुग्णसेवेतून दिसून येत आहे.आज महाराष्ट्रभरातून मंगेश सरांसाठी ज्या काही सोशल मीडियावर प्रतिक्रिया उमटत आहेत यातून मंगेश चिवटे सरांच रुग्णसेवेच कार्य किती लोकाभिमुख होत असे सांगायची कोणत्या ज्योतिषाची गरज नाही.मुख्यमंत्री वैद्यकीय कक्ष असं नाव जेव्हा कधी भविष्यात वाचनात येईल तेव्हा-तेव्हा फक्त एकच नाव सगळ्यांच्या नजरेसमोर असेल.ते म्हणजे आरोग्यदूत मंगेश चिवटे सर.महाराष्ट्राला या कक्षाची खरी ओळख मंगेश सरांनी करून दिली.याच सर्व श्रेय त्यांचच आहे.आरोग्यदूत मंगेश चिवटे सर यांच्या कार्याला सलाम.!

**केतन दत्ताराम भोज**
**कार्यकारिणी सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**
**भ्रमणध्वनी - ८८७९५४४५४०**

# संतोष जुवेकर आणि प्रियदर्शनी इंदलकर यांचा 'रुखवत' चित्रपट आता २७ डिसेंबरला होणार रिलीज

अल्ट्रा मीडिया आणि एंटरटेनमेंट येथे आज आयोजित पत्रकार परिषदेत, चित्रपटाच्या निर्मात्यांनी रुखवत चित्रपट १३ डिसेंबर नसून २७ डिसेंबर २०२४ रोजी ख्रिसमस सुट्टीच्या वेळीस चित्रपटगृहात दाखल होईल ह्याची घोषणा केली. तसेच ह्या परिषदेत मुख्य अभिनेता संतोष जुवेकर आणि अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर यांनी आपली उपस्थिती दर्शवली. तसेच ह्या परिषदेत मुख्य अभिनेता संतोष जुवेकर आणि अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर पत्रकार परिषदेत बोलताना, मुख्य अभिनेता संतोष जुवेकर म्हणाला, रुखवत हा एक पारंपारिक महाराष्ट्रीयन विधी आहे जो जुन्या काळात वधूचे कौशल्ये दर्शवत असे. वर्षानुवर्षे ते लग्नसमारंभातून कमी होत होते. सस्पेन्स थ्रिलरच्या माध्यमातून आपल्या समाजाचा अविभाज्य भाग असलेल्या परंपरा पुन्हा जागृत करण्याचा हा एक छोटासा प्रयत्न आहे.

अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकर पुढे म्हणाली, ह्या चित्रपटात एखाद्या जोडप्याचे नाते सात जन्मांचे बंधन असल्यासारखे पाहायला मिळेल.सस्पेन्स, थ्रिल आणि पारंपारिक मूल्यांनी भरलेल्या दोन नायकांची कथा सांगण्यासाठी रुखवत महत्त्वाची भूमिका बजावेल.

प्रेम, विरह, आणि ऋतूंच्या बदलत्या छटांची सुंदर अनुभूती देणारं 'ऋतु प्रेमवेडा' गाणं आणि लगीन समारंभांची पारंपारिक रोषणाई देणारं 'लगीन सराई' हे गाणं तुमच्या भेटीला आले असून हि दोनही गाणी ऐकताच प्रेक्षकांना एक



अनोखा अनुभव मिळणार आहे. ट्रेलर आणि गाणी धमाल आहे म्हटल्यावर चित्रपट सुद्धा भारी असेल यात काही शंका नाही.

सुशीलकुमार अग्रवाल आणि अल्ट्रा मीडिया एंटरटेनमेंट ग्रुप द्वारे प्रस्तुत आणि राबरी एन्टरटेन्मेंटने द्वारे निर्मित केला गेला आहे. तसेच ब्रिंदा अग्रवाल या देखील निर्मात्या असून उद्योजक म्हणून, त्यांनी नेहमीच मनोरंजन आणि संस्कृतीच्या क्षेत्रात नवकल्पकतेला प्रोत्साहन दिले आहे. त्यांचा दृष्टिकोन आणि उत्पादनाची गुणवत्ता रुखवत मध्ये दिसून येईल. प्रसिद्ध दिग्दर्शक विक्रम प्रधान यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून आपल्या कथा आणि चित्रणाद्वारे दर्शकांना वेगवेगळ्या अनोख्या अनुभवांची वासना दिली आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक विक्रम प्रधान यांनी चित्रपटाचे दिग्दर्शन केले असून आपल्या कथा आणि चित्रणाद्वारे दर्शकांना वेगवेगळ्या अनोख्या अनुभवांची वासना दिली आहे.

रुखवत मध्ये त्यांनी सांस्कृतिक धारा आणि थ्रिलर कथानक यांचे सुंदर मिश्रण लोकांपुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

पान १ वरुन

## गृहमंत्री, अर्थमंत्री...

भरत गोगावले, संजय शिरसाट, राजेश क्षीरसागर, आशिष जैस्वाल, प्रताप सरनाईक, प्रकाश सुर्वे, योगेश कदम, बालाजी किणीकर, प्रकाश आबिटकर विधानसभेच्या निवडणुकीत सर्वाधिक जागा जिंकून भाजप मोठा पक्ष बनला आहे. तसेच त्यांना अपक्ष आणि छोट्या पक्षांचाही पाठिंबा आहे. त्यामुळे अर्थ, गृह आणि नगरविकास खाती ही भाजपकडेच राहावीत, ती राष्ट्रवादी वा शिंदेंच्या शिवसेनेला देऊ नयेत असा एक मतप्रवाह भाजपमध्ये आहे.

सोमवार, १६ डिसेंबरपासून राज्याच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होणार आहे. त्या आधी म्हणजे १४ डिसेंबर रोजी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार अशी चर्चा आहे.

देवेंद्र फडणवीसांनी राजधानी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपाच्या प्रमुख नेत्यांशी झालेल्या भेटीचा तपशील सांगितला. एक पद्धत आहे की जेव्हा आपण मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतो, त्यानंतर राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, सभापती यांची भेट घ्यायची असते. त्यानुसार मी त्यांची भेट घेतली आहे. आज सकाळी पंतप्रधानांशी माझी प्रदीर्घ चर्चा झाली. त्यात मी त्यांचे आशीर्वादही घेतले. त्यावेळी महाराष्ट्रासंदर्भात आमची काही चर्चाही झाली आहे. पंतप्रधानांनी मला सांगितलं आहे की महाराष्ट्र देशाच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचं राज्य आहे. या राज्याला गतीशील ठेवणं अत्यंत गरजेचं आहे. त्यादृष्टीने पंतप्रधान महाराष्ट्राला पूर्ण सहकार्य द्यायला तयार आहेत, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. काल पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा, गृहमंत्री अमित शाह, नितीन गडकरी, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह अशा पक्षाच्या प्रमुख लोकांची सदिच्छा भेट घेतली आहे. रात्री जे. पी. नड्डा, अमित शाह आणि बी. एल. संतोष यांच्याशी मंत्रीमंडळाबाबत चर्चा केली, अशीही माहिती देवेंद्र फडणवीसांनी दिली.

दरम्यान, उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना एकनाथ शिंदे यांच्याकडून गृहखात्याचा आग्रह धरण्यात आल्याचं बोललं जात आहे. अजूनही शिंदे गट गृहखात्यासाठी आग्रही असल्याची भूमिका मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर गृहखातं नेमकं कुणाकडे जाणार? याविषयी मोठी उत्सुकता निर्माण झालेली असताना देवेंद्र फडणवीसांनी मात्र यावर बोलणं टाळलं आहे. पत्रकारांनी याबाबत विचारणा केली असता अरे बाबा थोडी वाट पाहा ना, एवढी घाई काय आहे. सगळं सांगतो, असं ते म्हणाले.

## गीता ही ...

तसेच असंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.. संकट येत असेल त्यावेळेस त्यावेळेस आपण काय केलं पाहिजे याचाही विचार गीता मानते. गीतेमध्ये कर्म सांगितले असून ते कर्म इतरांची दयाळू पणे, करुणाने आणि उदारतेने, लागल्यास तेच आपल्याला प्रत्येकाकडून मिळते हे गीता संदेश देतो. गीतेमध्ये कर्माचा सिद्धांत सांगितलेला आहे. गीता एकूण १८ अध्यायाचे आहे, प्रथम अध्याय ते अठरा अध्याय मध्ये काय काय सांगितलेलं आहे याचे विवेचन प्राध्यापक अरुण आहेर यांनी आपल्या व्याख्यानात केला. जेव्हा अर्जुन गोंधळलेला असतो अंशाने भरकटलेला असतो तेव्हा तो श्रीकृष्णाला संदेश विचारते, १८ अध्यायाची गीता श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात. गीता आत्मसाक्षात्काराचे ज्ञान आत्मज्ञान प्राप्त करण्याची दिशा सांगते. आपले कार्य करत असताना फळाची इच्छा वाढवू नका हेच गीता सांगते. विद्यार्थ्यांनी या गीता संदेशासाठी प्रतिसाद दिला. सूत्रसंचालन वासुदेव शिरसागर यांनी केले. तर आभार पाटील मॅडम यांनी मानले.

## मंदीरांची संपत्ती ...

डॉ. राजेश मिरगे यांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ.गणेश अग्रोहोत्री होते. प्रमुख अतिथी म्हणून प्रा. बसवराज कोरे होते व्यासपीठावर जरुड जि. अमरावती येथील प्राचार्य डॉ. राम फलसिंगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रमुख व्याख्याते म्हणून बोलताना डॉक्टर राजेश मिरगे म्हणाले की, स्वर्गीय भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांना दैववाद मान्य नव्हता माणूस हा कष्टातून मोठा होतो. माणसाच्या परिश्रमासोबत शिक्षणाची जोड असल्यास निश्चित जीवनामध्ये त्याची प्रगती होते. शेतकरी हा संपूर्ण जगाचा पोशिंदा असून त्याच्या मुलांनी शिकावे म्हणून त्यांनी सर्वांना शिक्षण मोफत मिळावे ही संकल्पना त्या काळात लावून धरली, त्याचा परिणाम असा की आज देशांमध्ये शैक्षणिक क्रांती झाली आहे याचे डॉ. पंजाबराव देशमुख यांना जाते. शेतकरी ,शेतमजूर, गोरगरीब जनता ,गर्भवती महिला, निराधार वृद्ध यांना विशेष शासनाकडून सवलती व अनुदान मिळावे याचाही आग्रह कृषिमंत्री असताना डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शासनाकडे धरला होता काही वर्षानंतर आज त्यांच्या त्यावेळच्या मागणी साकार झाल्याची दिसते. शिक्षणाशिवाय बहुजन समाजामध्ये क्रांती होऊ शकत नाही हा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा संदेश डॉक्टर पंजाबराव देशमुख यांनी पुढे नेला शिवाजी महाराजांसारखा राजा लोक कल्याणकारी होता, त्यांचा वारसा सत्तेतील लोकांनी जपावा ही आग्रह त्यांनी धरला. आज मात्र उलटे चित्र सत्ताधीशांमध्ये दिसत असल्याचेही डॉ. राजेश मिरगे यांनी सांगितले. आजच्या युवा पिढीने डॉ.पंजाबराव देशमुख यांचा आदर्श घेऊन पुढील जीवनामध्ये वाटचाल करावी त्यामुळे त्यांच्या जीवनात सुख समृद्धी येईल असेही डॉ. मिरगे यांनी सांगितले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून बोलताना प्रा.बसवराज कोरे म्हणाले की आजच्या युवा पिढीने व्यसनाच्या मागे न जाता शिक्षण पूर्ण करावे, शिक्षण पूर्ण करून आपल्या प्रपंचाला हातभार लावावा ,आई-वडिलांचे स्वप्न साकार करावे.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री म्हणाले की, युवा पिढीने डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवनावरील ग्रंथ वाचून त्या पद्धतीने वाटचाल केल्यास निश्चित त्यांच्यामध्ये अमूलग्राह्य बदल होतील ,डॉ.पंजाबराव देशमुख हे देशातील कृषी क्रांतीचे प्रणेते होते, त्यांचा आदर्श आजच्या युवा पिढीने घ्यावा, असेही डॉक्टर अग्निहोत्री यांनी सांगितले.

यावेळी प्रा. डॉ.यशवंत सोनुने प्रा. फलके प्रा. श्रीरामे, प्रा.उषा पवार , प्रा. रंजना येपुरवार, आदि, विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. लक्ष्मीकांत शिंदे यांनी तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी व्यक्त केलेत.

## मानवाच्या हक्काचे स्मरण व्हावे, यासाठी मानवी हक्क दिन साजरा केला जातो - प्रा. जाधव



**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** येथील नवभारत कनिष्ठ महाविद्यालय व श्रीमती जे बी के विद्यालय मध्ये दहा डिसेंबर हा जागतिक मानवी हक्क दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवभारत कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य तथा संचालक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर हे होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्राध्यापक कैलास जाधव हे उपस्थित होते. त्यांनी मानवी हक्क दिनावर व्याख्यान देतांना सांगितले, जगात मानवी हनन होऊ नये यासाठी संयुक्त राष्ट्राच्या संघटनेने मानवी हक्क दिन साजरा करण्याचे ठरवले आहे. जागतिक मानव हक्क दिन दरवर्षी जगामध्ये १० डिसेंबर रोजी साजरा केला जातो. मानवी हक्क दिन हे समानता, स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठेच्या सार्वत्रिक बांधिलकीचा पुरावा आहे. हे पुढे म्हणाले की प्रतिबंधात्मक, संरक्षणात्मक, आणि चांगल्या संवर्धनासाठी परिवर्तनात्मक शक्ती म्हणून मानवी हक्क महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. यासाठी मानवी हक्काचे स्मरण व्हावे यासाठीच मानवी हक्क दिन साजरा केला जातो. मानवी हक्क दिनाचा करार चळवळीच्या स्वातंत्र्यासारख्या अधिकाराशी संबंधित आहे. कायद्यासमोर समानता, निष्पक्ष चाचणीचा अधिकार, आणि निर्दोस्थेची धारणा, विचार विवेक आणि धर्म, स्वातंत्र्य मत आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य शांततापूर्ण सभा, सहवासाची स्वातंत्र्य, सार्वजनिक घडामोडी, या गोष्टी मानवाधिकारात येत असतात. आणि याचे स्वातंत्र्य सर्वांना असते. जगात मानवी हक्क दिन ३० सार्वभौमिक स्वरूपात आहेत. ज्यात जीवनाचे अधिकार, शिक्षणाचे अधिकार, संघटित करण्याचे अधिकार, इतर गोष्टी बरोबर न्याय वागणुकीची अधिकार, त्याची गोष्टी या ३० मूलभूत अधिकारात येतात. या कार्यक्रमाचे यशस्वीतेसाठी, जुनिअर कॉलेजचे प्राध्यापक सुनील बनसोडे, प्रा. डॉ. आनंद जाधव, प्रा. अरुण आहेर, प्रा. गजानन धोटे, वासुदेव क्षीरसागर, पाटील मॅडम, शेख, भिलावेकर, जाधव आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास दगडोबा तांबेकर, दीपक देशमुख, लंबे मॅडम, सह सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

### ग्रोव्हिजन गटशेती संघांचे टाकळी माळीत चर्चासत्र

## जमिनीचे आरोग्य जपण्याची गरज - प्रकाश देशमुख; शेतीला पुरक व्यवसायाची आवश्यकता - डॉ. पवार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** शेतीला पाणी व हवामान बदलाची मोठी समस्या निर्माण झाली असून आता जमिनीचे आरोग्य जपण्याची वेळ आली आहे असे प्रतिपादन छत्रपती संभाजीनगरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री. प्रकाश देशमुख यांनी केले तर शेतीच्या पुरक व्यवसायातूनच शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळेल असे छत्रपती संभाजीनगर येथील राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. सूर्यकांत पवार यांनी व्यक्त केले.

शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांची शेतकऱ्यांसाठी स्वयंप्रेरणेने चालविलेली संपूर्ण शेती चळवळ हे ब्रीद घेऊन चाललेल्या ग्रोव्हिजन गटशेती संघाच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या ९ तारखेस आयोजिण्यात येणारे सन २०२४ डिसेंबर महिन्यातील नियमित मासिक चर्चासत्र सोमवार (दि. ९) रोजी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील मौजे टाकळी (माळी) येथे पार पडले. याप्रसंगी उभयतांनी मार्गदर्शन केले. मा. प्राचार्य श्री. डॉ. सर्जेराव ठोंबरे यांनी आपल्या भाषणात निसर्ग व गोमाता वाचविण्याचे आवाहन केले तर तालुका कृषी अधिकारी श्री. एम. एस. गुळवे यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली.

ग्रोव्हिजन गटशेती संघांचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी कार्यक्रमाचे संचालन करून ग्रोव्हिजन गटशेती संघ करत असलेल्या कार्याची उपस्थितांना माहिती दिली. जालना जिल्ह्यातील ग्रोव्हिजन गटशेतीतील दहिगावचे श्री. नंदकिशोर देशमुख, वखारीचे श्री. राम प्रसाद खैरे, कुसळीचे श्री. विठ्ठल वैद्य, गोषेगावचे श्री. रविंद्र मोहिते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



मधुमक्षिका पालक श्री. गणेश बुरकूल यांनी मधुमक्षिका पालनाबाबत प्रात्यक्षिकासह माहिती देऊन उपस्थितांचे आभार मानले.

यावेळी शिवार फेरी करण्यात आली. वन भोजनाने चर्चासत्राची सांगता झाली.

कार्यक्रमाला सौ. साजर ठोंबरे, मंडळ कृषी अधिकारी श्री. शिवानंद आडे, कृषी सहाय्यक श्री. डी. पी. डोळस, श्री. सुदाम गाडेकर, श्री. संजय ठोंबरे, श्री. तुकाराम ठोंबरे, श्री. प्रताप ठोंबरे, श्री. आप्पासाहेब ठोंबरे, श्री. आन्सीराम कुबेर, श्री. राहुल जाधव, श्री. ज्ञानेश्वर बुरकूल यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## मुंबई घाटकोपर पश्चिम भागातील स्थानक मार्ग, एमजी रोड फेरीवाला मुक्त केव्हा होणार?

### कुर्ला अपघात घटनेची पुनरावृत्ती झाल्यावर प्रशासनाला जाग येणार का?

**घाटकोपर । प्रतिनिधी -** मुंबई उपनगरातील कुर्ला परिसरात सोमवारी रात्री एका बेस्ट बसने नागरिकांना चिरडल्याची दुर्देवी घटना घडली.या भीषण अपघातात आता पर्यंत ७ जणांचा मृत्यू झाला असून ४९ जण जखमी झाल्याची माहिती मिळाली आहे.कुर्ला पश्चिम रेल्वे स्टेशन रोडवरील आंबेडकर नगर येथे बेस्ट बसचा हा भीषण अपघात झाला.कुर्ला अपघातात पदपथ चालण्यासाठी मोकळे नव्हते म्हणून एवढी मनुष्य हानी झाल्याचे कारण आहे.





तर दुसरीकडे घाटकोपर पश्चिमेकडील रेल्वे स्थानक,मेट्रो स्टेशन परिसर आणि घाटकोपर रेल्वे स्थानकाला जोडणारे रस्ते एमजी रोड,हिराचंद देसाई मार्ग,लाल बहादूर शास्त्री मार्ग याठिकाणी अनधिकृत फेरीवाल्यांमुळे दिवसागणिक वाहतूक कोंडीची ही समस्या वाढत चालली आहे.मजोर अनधिकृत फेरीवाले आणि बेशिस्त पार्किंगमुळे याठिकाणी वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असून सायंकाळ नंतर या मार्गावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागताना दिसतात.परिणामी वाहन चालकांना देखील आपली वाहने याठिकांनहून चालवणे अवघड जाते. घाटकोपर स्थानक परिसरात प्रवाशांची गर्दी दिवसेंदिवस वाढत असल्याने तसेच स्थानकाबाहेर अनधिकृत फेरीवाल्यांनी आपले बस्तान मांडून ठेवल्याने परिणामी प्रवाशी आणि वाहन चालक यांना या मार्गावर अनधिकृत फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडीच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे.स्थानक परिसरात अनधिकृत फेरीवाले मोठ्या प्रमाणात असल्याने बेस्ट बस आणि इतर वाहनांना मार्ग काढणे अवघड जात आहे.तरी याबाबत संबंधित स्थानिक प्रशासनाकडून यावर कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसत नाही.त्यामूळे या अनधिकृत फेरीवाल्यांना संबंधित स्थानिक प्रशासन अभय देत आहे का?असा सवाल नागरिक करत आहेत.तर या फेरीवाल्यांनी नागरिकांसाठी असणारे फुटपाथ ही गिळंकृत केले असून फुटपाथ ही ताब्यात घेतले आहेत तरी या फेरीवाल्यांचा घाटकोपरकरांना खूप त्रास सहन करावा लागत आहे,परिणामी याठिकाणी फेरीवाल्यांनी नागरिकांसाठी असलेले पदपथ ताब्यात घेतले असल्याकारणाने सायंकाळच्यावेळी नागरिकांना चालणे ही अवघड होत आहे. त्यामूळे नागरिक आणि वाहन चालक दोघांनाही एकत्र रस्त्यामधून वाट काढावी लागत असल्याकारणाने याठिकाणी अपघात अथवा जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.घाटकोपर पोस्ट ऑफिस परिसराची ही तिचं स्थिती आहे.परंतु यावर महापालिका आणि पोलिसांकडून ठोस कारवाईच केली जात नसल्याने सामान्य नागरिक आणि वाहन चालक हे निर्माण केले जाणारे अडथळे,अनधिकृत फेरीवाल्यांमुळे त्रस्त झाले आहेत.त्यामुळे या अनधिकृत फेरीवाल्यांना कोणाचा वरदहस्त आहे?कोणाच्या आशीर्वादाने हे मुजोर फेरीवाले आपले बस्तान मांडतात. त्यांच्यावर कठोर कारवाई का होत नाही,कोणाच्या अभयामुळे हे सर्व प्रकार चालू आहेत,याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे.तरी घाटकोपर पश्चिम याठिकाणी कुर्ला अपघात घटनेची पुनरावृत्ती झाल्यावर प्रशासनाला जाग येणार का?असा सवाल त्रस्त नागरिक विचारत आहेत.

## श्रीराम वाचनालयात गीता जयंती साजरी



**जालना । प्रतिनिधी -** ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालय व श्रीराम संस्कृत विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीराम संस्कृत विद्यालयाच्या श्रीराम गीता अभ्यास वर्ग व बाल संस्कार वर्गच्या वतीने गीता जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथ संग्रहालय श्रीराम वाचनालयाचे सदस्य सुधाकर भालेराव,गीता वर्ग संस्कृत शिक्षक संजय हेबारे,जालना येथील किड्स केब्रीजच्या शिक्षिका कविता नरवडे यांची उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते योगेश्वर श्रीकृष्ण प्रतिमा व श्रीमद्भगवद्गीता ग्रंथाच्या पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करणात आली.

संजय हेबारे मनोगत व्यक्त करतांत म्हणाले कि, आपण जीवन कसे जगायचे त्यासाठी भगवंताने आपल्याला श्रीमद्भगवद्गीता दिली आहे श्रीमद्भगवद्गीता हा धर्माचा ग्रंथ नाहीतर व्यक्तिला जीवन जगण्याचा मार्गदशक ग्रंथ आहे. आपल्या घरातील आई ज्याप्रमाणे चांगले संस्कार देते त्याचप्रमाणे गीतेतून आपल्यावर चांगले संस्कार होत असल्यामुळे गीता आपल्याला आई सारखीच आहे. गीतेचा अभ्यास हा परदेशात सुरु आहे परंतू आपल्या भारतात होत नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. गीतेच्या पठनाने व्यक्तिचे विचार,आचरण चांगले होऊन व्यक्ति वाईट मार्गला लागत नाही. जीवनाला रंगीत, अर्थपूर्ण बनवण्यासाठी गीतेचा अभ्यास करावा, व्यक्तिला विचारांची केलेली मदत कायम टिकत असल्यामुळे सर्वांनी गीतेचा प्रचार-प्रसार करावा व गीता ही घरा-घरा पर्यंत पोहचावी.

कविता नरवडे मनोगत व्यक्त करतांत म्हणाले कि,गीतेतील श्लोक हे ईश्वराने लिहलेले आहे. आयुष्यामध्ये जीवन जगतांना येणाऱ्या अडचणींवरील मार्ग गीतेत असल्यामुळे गीताचा अभ्यास करावा. याप्रसंगी श्रीमद्भगवद्गीतेच्या १२ व्या अध्यायाचे सामुहिक पारायण करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम शेलगावकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार सुधाकर भालेराव यांनी मानले. याप्रसंगी लावण्या लड्डा, प्रतिक खाडे, सानवी खाडे, वल्लभ शेलगावकर,अर्णव शर्मा,गुलाबराव चौरे,शेख अकबर, धुंडीराम पाजणकर, आसाराम करंडे, किर्ती शेलगांवकर,सतीश नरवडे,आशिष उबाळे,वसंत मिटकरी, पाडुरंग काळे,विजय खिल्लारे,रामकृष्ण खैरे,शैलेन्द्र बदनापुरकर,ओम आहेर यासह गीता वर्गाचे पालक ,संस्कृत शिक्षक व श्रीराम वाचनालयाचा वाचक वर्ग उपस्थित होता.

### आमडोशी येथे जागतिक मृदा दिन संपन्न

## माणगाव तालुका कृषि अधिकारी किरण पडवळकर यांचे मार्गदर्शन




**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** तालुका कृषी अधिकारी कार्यालय माणगाव यांच्या मार्फत मा. तालुका कृषी अधिकारी श्री. किरण पडवळकर यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक ५ डिसेंबर २०२४ रोजी जागतिक मृदा दिनानिमित्त मौजे - आमडोशी येथे शेतकरी मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रभारी अधिकारी, कृषी संशोधन केंद्र, रेपोली येथील डॉ.प्रशांत निगडे, यांनी माती परिक्षनाचे महत्व, माती संवर्धन कशा प्रकारे करावयाचे याबाबत उपस्थित शेतकऱ्याना मार्गदर्शन केले.

सुयश नलावडे कृषी पर्यवेक्षक यांनी माती नमुना कसा काढायचा व मातीचे गुणधर्म, अन्नद्रव्यांचे प्रमाण याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कृषी सहाय्यक श्री.अमोल गावडे यांनी जमीन आरोग्य पत्रिका यांचे बदल सविस्तर माहिती दिली, तसेच उपस्थित शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्व समजावून सांगितले. तसेच कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती दिली.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक श्री. अमोल गावडे यांनी केले तर आभार प्रदर्शन रायगडचा राजा शेतकरी उत्पादक कंपनीचे अध्यक्ष श्री.रमेश शिगवण यांनी केले. कार्यक्रमास कृषी पर्यवेक्षक श्री. कृष्णा शिंदे,श्री. सुयश नलावडे, कृषी सहाय्यक श्री. विजय भाकरे व मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

## परतुर रेल्वे स्टेशनवरील शेडचे काम संथगतीने

**परतूर । प्रतिनिधी -** अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत परतूर जिल्हा जालना या रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाचा भूमिपूजन सोहळा नुकताच काही महिन्यांपूर्वी संपन्न झाला होता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे देशातील महत्त्वाच्या रेल्वे स्थानकांच्या पूर्णविकासाचा शुभारंभ झाला होता त्या पैकी परतुर हे एक रेल्वे स्टेशन आहे, यासाठी मुबलक प्रमाणात निधी देण्यात आला आहे, एवढा मोठा निधी असताना देखील परतूर रेल्वे स्थानकावरील शेडचे काम अतिशय संथ गतीने चालू आहे. रेल्वे स्टेशन वरील प्लॅटफॉर्मवर पत्र्याचे शेड उभारणीसाठी वापरण्यात येणारे लोखंडी अँगलची वेल्डिंग प्लॅटफॉर्मवरच केली जात आहे, वेल्डिंग करून तयार झालेला ढाचा रेल्वे प्लॅटफॉर्मवर बऱ्याच दिवसापासून पडलेला दिसत आहे. त्यामुळे रेल्वे आल्यानंतर प्रवाशांना उतरतांना अडचण निर्माण होत आहे, रात्रीच्या वेळेस गाडीमधून उतरतांना समोरच पडलेले लोखंडी अँगल व तयार झालेला ढाचा प्रवाशांना रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्मवर अंधार असल्यामुळे दिसत नसल्यामुळे ठोकर लागून पडत देखील आहेत या गंभीर गोष्टीची दखल घेऊन रेल्वे प्रशासनाने हे लोखंडी अँगल लवकरात लवकर उचलून घेऊन पत्रे टाकून शेड उभारावे व प्रवाशांची होणारी गैरसोय टाळावी अशी मागणी रेल्वे प्रवाशाच्या वतीने होत आहे.

### जालन्यात परभणी घटनेचा निषेध;

## संबंधीत आरोपीविरूध्द देशद्रोहाचा गुन्हा नोंदवा- दांडेकर

**जालना । प्रतिनिधी -** परभणी शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याशेजारील भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीचा अवमान व संविधान विरोधी घोषणाबाजी या कृतीचा जाहीर निषेध करत संबंधीत आरोपीविरूध्द देशद्रोहाचा गुन्हा नोंदवावा अशी मागणी भीम आर्मीचे जिल्हाप्रमुख सुभाष दांडेकर यांनी केली आहे. परभणी शहरात मंगळवार १० डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास जिल्हाधिकारी कार्यालय ते बस स्टँड रोड येथील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. त्या ठिकाणी असलेल्या भारतीय संविधानाच्या संदेशक प्रतिकृतीची एका समाज कंटकाने विटबंना केली. सदर घटनेचा जालना शहरात भीम आर्मीच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवाच्या सुरुवातीस अशा पद्धतीने विकृत व अवमानकारक



कृत्य होत असेल तर आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात खर्या स्वातंत्र्यात आहोत काय? हा खरा प्रश्न उभा राहतो. असे दांडेकर म्हणाले. सदर घडलेल्या घटनेची मुळ पार्श्वभूमी तपासून सक्षम यंत्रणे कडून चौकशी होऊन दोषींवर कठोरात कठोर कारवाई करावी अशा आशयाची मागणी करण्यात आली.यावेळी भीम आर्मीचे ॲड. सुभाष सरोदे, वामन दादा दांडगे, एम. यु. पठाण, शांतीलाल दाभाडे, आसाराम पगारे, विठ्ठल कासारे, अंबादास शेजुळ, राजु आढाव यांच्यासह भीम आर्मीचे पदाधिकारी, भीम सैनिक उपस्थित होते.

## पेंशन अदालतीचे आयोजन




**जालना । प्रतिनिधी -** विभागीय आयुक्त कार्यालयातील आस्थापना उपायुक्त यांनी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निकाली काढण्याबाबत निर्देश दिले आहेत. त्यानूसार पेंशन अदालत शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वाजता जालना जिल्हा परिषदेतील उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) यांच्या दालनात आयोजित आली आहे. तरी पेंशन अदालतीसाठी सेवानिवृत्तांनी, कुटुंबनिवृत्ती वेतन धारकांनी प्रकरणाच्या माहितीसह उपस्थित रहावे, असे आवाहन उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# भाजपा जालना कडून लोकनेते माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथ मुंडे यांना जयंती निमित्त अभिवादन




**जालना । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना कार्यालयात लोकनेते संघर्षयात्री माजी केंद्रीय मंत्री स्व.गोपीनाथराव मुंडे यांना जयंती निमित्त गुरुवार (दि.१२) रोजी विनम्र अभिवादन करण्यात आले होते.

यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, महानगर जिल्हाध्यक्ष सतीष जाधव, प्रदेश सदस्य विजय कामड, ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सोपान पेंढारकर, जिल्हा सरचिटणीस सिद्धिविनायक मुळे, प्रसिद्धीप्रमुख बाबासाहेब कोलते, नगरसेवक ज्ञानेश्वर ढोबळे, शशीकांत घुगे, सुनील पवार, मंडळ प्रभारी अमोल कारंजेकर, मंडळाध्यक्ष सुभाष सले, आनंद झारकंडे, रामलाल जाधव, मंडळ प्रभारी प्रमोद गंडाळ, महानगर उपाध्यक्ष सुहास मुंडे, अल्पसंख्याक मोर्चा महानगराध्यक्ष सय्यद इम्रान अली, ओबीसी मोर्चा महानगराध्यक्ष डोंगरसिंग साबळे, विकास कदम, कामगार आघाडी संयोजक माणिक फड, सदस्य जगदीश येणगुपटला, उमेश पेंढारकर, राजाराम जाधव, गणेश वाघमारे, महेश मुळे, सुदर्शन काळे, रोहित नलावडे, संजय माधवाले, अकबर परसूवाले, अनिल यशवंते, निलेश गवळी, शाम उगले यांच्यासह (स्वीय सहायक गोवर्धन कोल्हे, राजेश जोशी) व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

एकनाथ शिंदे व मोपलवार यांच्या संगणमताने खोतकरांनी साखर कारखाना उद्‌ध्वस्त केला!

# अर्जुन खोतकर यांना मंत्रिमंडळात घेऊ नये

## रामनगर साखर कारखाना कृति बचाव समितीचे एकनाथ शिंदे यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** जालन्याचे नवनिर्वाचित आमदार अर्जूनराव खोतकर यांना मंत्रीमंडळात घेण्यात येऊ नये, अशी मागणी येथील जालना सहकारी साखर कारखाना सभासद शेतकरी व कामगार बचाव कृती समितीच्या वतीने उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे विशेष म्हणजे दिलेल्या निवेदनात एकनाथ शिंदे आणि मोपलवार यांच्या संगणमतानेच साखर कारखाना उद्‌ध्वस्त केल्याचा आरोपही कृती समितीच्यावतीने करण्यात आला आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, जालना जिल्ह्यातील बदनापूर व जालना तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात समृद्धी आणणारा जालना सहकारी साखर कारखाना आ. अर्जुन खोतकर यांनी तापडीया आणि मुळे या उद्योपतींना हाताशी धरून लुबाडून घेतला व कारखान्यातील मशिनरी, बॉयलर व साधनसामुग्री भंगाराच्या भावात विकून टाकली. कारखाना उध्वस्त करून तत्कालीन बांधकाम मंत्री एकनाथजी शिंदे आणि तत्कालीन रस्ते विकास कामंडळाचे अधिकारी राधेध्याम मोपलवार यांच्यासोबत संमनमत करून करोडो रुपयांचा फायदा करून घेण्यासाठी आता होऊ घातलेल्या जालना नांदेड समृद्धी महामार्ग या रस्त्याची पूर्वीचा सर्वे रद्द करून जालना सहकारी साखर कारखान्याच्या जमीनीतून सरळ जाणारा समृद्धी महामार्ग वळविण्यात आला आहे. त्यामुळे जालना मंठा रोडवर कारण नसताना दोन उड्डाण पुले बांधावी लागणार आहेत. त्यामुळे जालना-नांदेड रस्त्याची अंतर दोन ते तीन किमीने वाढणार आहे. समृद्धी महामार्ग दोन शहरातील अंतर कमी करण्यासाठी कमी वेळेत प्रवास होणे करिता तयार होणे गरजेचे आहे.

परंतु आ. अर्जुन खोतकर यांच्या अट्टाहासामुळे या रस्त्यांचे अंतर, वेळ आणि पुल बांधकामाचा खर्च वाढणार आहे. परिणामी याचा शासकीय तिजोरीवर भार पडणार आहे.

हा कारखाना शेतकऱ्यांनी दिलेल्या समभाग (शेअर्स) च्या पैशातून उभारण्यात आला आहे. परंतु या काखान्याच्या जमीनीतून समृद्धी महामार्ग गेल्याचा याचा संपूर्ण मोबदला हा आ. अर्जुन खोतकर यांच्या खिशात जाणार आहे. सदर कारखाना ईडीने जप्त केला असून ईडीने खोतकर, तापडीया व मुळे यांच्या ऑफिसवर छापे टाकून गुन्हे दाखल केलेले आहेत. सद्यस्थिती ही कारखान्याची मालमत्ता ईडीच्या ताब्यात आहे.

आ. अर्जुन खोतकर यांच्या कटकारस्थानामुळे जालना व बदनापूर तालुक्यातील सुमारे २००० कामगार व १५००० पेक्षा जास्त सभासद शेतकरी यांचा उदरनिर्वाह करण्याचे साधन उध्वस्त झाले आहे. या प्रकरणी आपण जातीने लक्ष घालून ही मालमत्ता ईडीच्या ताब्यातून सोडवून शेतकऱ्यांच्या हवाली करून चालू करण्यात यावा व कामगारांच्या रोजगाराचा प्रश्न सोडविण्यात यावा.

अशा आशयाचे निवेदन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले .

दिलेल्या निवेदनावर जालना सहकारी साखर कारखाना सभासद,शेतकरी व कामगार बचाव कृती समितीचे ज्ञानेश्वर भांदरगे,लक्ष्मण राजेशिंदे, अरूण वझरकर, नारायण वाडेकर, प्रल्हाद भेकाडे, ज्ञानेश्वर देवडे, विलास वाघमारे, साईतराम शेटे ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.